# बहुवर्षीय दर नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय- योजना

## वित्तीय वर्ष - २०११-१२ ते वित्तीय वर्ष २०१५-१६

---

सादरकर्ते

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित

(महापारेषण)

कार्यकारी सारांश

(Executive Summary)

---

## बहुवर्षीय नियंत्रण कालावधीसाठी

## महामारेषणची व्यवसाय योजना (विषय २०११-१२ ते २०१५-१६)

---

## अनुक्रमणिका

---

१. पार्श्र्वभुमी

१.१ व्यवसाय योजनेची उद्दिष्टे

कार्यकारी सारांश

१.२ व्यवसाय योजनेच्या मर्यादा

१.३ दृष्टिकोन आणि पध्दति मी मां सा

२. कार्यकारी योजना

२.१ भांडवली गुंतवणूकी योजना (CIP)

२.१.१ प्रस्तावित भांडवली खर्च

२.२ तांत्रिक सुधारणा योजना (TIP)

२.२.१ संचालन व सुधारणा पध्दती मधील नवीन उपाय योजना

२.३ ऑप्टीक पॉवर ग्राउड वायर वापरुन तयार केलेल्या सर्वकण संपर्क जाळयाची स्थापना

२.४ भांडवली गुंतवणूक योजना व तांत्रिक सुधारण योजना यासाठी वीत्त पुरवठा

२.५ दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी खर्चाचे प्रक्षेपण
२.५.१संचालन व सुव्यवस्था (सं व सु) खर्च
२.५.१.१ वित्तीय वर्षे २०११-१२ आणि २०१२-१३ मधील सं व सु खर्च
२.५.१.२ वित्तीय वर्षे २०१३-१४ पासून २०१५-१६ पर्यंतचे सं व सु खर्च
२.५.२व्याज व वित्तीय आकार
२.५.३मत्ता व घसारा
२.५.४खेळत्या भांडवलाचे व ग्राहक सुरक्षा अनामत यांचे व्याज
२.५.५समभागावर मिळकत
२.५.६इतर खर्च
२.५.६.१ इतर खर्च
२.५.६.२ आकस्मिक राखीव
२.५.६.३ प्राप्तीकर
२.५.७दरांव्यतिरिक्त उत्पन्न
२.५.८ गोवा राज्यांकडुन मिळालेले व्हिलींज चार्वेसचे उत्पन्न (यंत्रणा वापर आकार)
२.६ वित्तीय वर्ष २०११-१२ साठी महसूलातील फरक / अंतर (रिव्हेन्यु गॅप)
३. वार्षिक महसूल गरजेचे (ARR) प्रक्षेपण (Projection)
३.१ वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय २०१५-१६ साठी प्राप्ती कर
३.२ दृष्यांचे विश्लेषण
३.२.१संचालन व सुव्यवस्था खर्च

३.२.२दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज

३.२.३(कल्पित) तीन दृष्यांतील वार्षिक महसूल गरजेंची तूलना

३.३ कार्यपूर्तीचे निर्देशांक

३.३.१पारेषण प्रणालीची उपलब्धता

३.३.२पारेषण हानी

## १. पार्श्वभूमी

### १.१ व्यवसाय योजनेची उद्दिष्टे

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी, मर्यादित (महापारेषण - MSETCL) ही राज्याच्या मालकीची सार्वजनिक उपयोगासाठी केलेली संस्था (Public Utility) आहे. विजेचे आतंर राज्य पारेषण करणे, राज्य पारेषण यंत्रणेचे नियोजन, विकास व देखभाल करणे व त्याद्वारे महाराष्ट्र राज्यातील विज विषयक व्यवहार सुरक्षित व खात्रीशीररित्या करणे यांची जबाबदारी या कंपनीकडे आहे.

महापारेषणचे कार्य माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (MERC) यांच्या नियमनानुसार करण्यात येते. माननीय आयोगाच्या आदेशानुसार महापारेषण कंमनी वित्तीय वर्षे २०११-१२ ते २०१५-१६ या नियंत्रण वर्षाच्या कालावधासाठी दुसरी बहुवर्षीय दर व्यवहाराची योजना सादर करीत आहे.

मा. आयोगाने वि.वर्ष २०११-१२ ते वि.वर्ष २०१५-१६ या काळाकरीता लागू होणारा बहुवर्षिय दर नियमावली २०११ जारी केले त्यातील नियम ७.१ यानुसार वीज निर्मिती कंपनी, पारेषण अनुपध्दती धारक आणि वितरण अनुपध्दती धारक संस्थाना १एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१६ या पाच वित्तीय वर्षांच्या नियंत्रण कालावधीसाठी एक व्यवसाय योजना (Business Plan) दाखल करण्याचा आदेश आहे.

महापारेषण कंपनीने मा. आयोगाकडे एक विनंती अर्ज सादर करुन पाच वर्षाच्या मुदतीसाठी दर निश्चित करणे आणि म.वि.नि.आयोग नियमावली २०११ लागू करणे यापासून माफी मिळावी अशी विनंती केली होती.

मा. आयोगाने सदर विनंती अर्जावर दि. ३ नोव्हेंबर २०११ रोजी आदेश देऊन महापारेषण ला बहुवर्षीय दराच्या आकृती बंधाद्वारे दर निश्चित करण्यास दि. ३१ मार्च २०१३ पर्यंत (म्हणजेच २ वर्षाच्या मुदतीसाठी) सूट दिली होती.

महापारेषण आता विनंती अर्ज करुन वित्तीय वर्षे २०११-१२ ते २०१५-१६ या मुदतीची व्यवसाय योजना मंजुरासाठी सादर करीत आहे. यामध्ये वि. वर्षे २०११-१२ व २०१२-१३ यासाठी केलेली प्रक्षेपणे, दर नियमावली २००५ यातील मार्गदर्शनाप्रमाणे केली आहेत. आणि वि. वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ या मुदतीसाठी केलेली प्रक्षेपणे ही म.वि.नि. आयोग (बहुवर्षीय दर) नियमावली २०११ यातील तरतुदींच्या मार्गदर्शनानुसार केली आहेत. मात्र जेथे प्रमाणके व तरतुदी यापासून काही विचलन झाले असल्यास त्याबाबत महापारेषणने पुरेसे समर्थन देऊन परवानगी मागितली आहे.

## १.२ व्यवहार योजनेच्या मर्यादा

महापारेषण तर्फे, मा.म.नि आयोगाची बहुवर्षीय दर नियमावली २०११ याबाबतचे अभिप्राय आणि / किंवा सूचना या विषयी असलेले महापारेषणचे म्हणणे किंवा विवाद आणि हळु यांना कोणताही बाध न येता, वित्तीय वर्षे २०१-१२ ते २०१५-१६ या कालाधीची व्यावसायिक योजना सादर करण्यात येत आहे

या दीर्घ कालिन योजनेतील माहितीचल प्रक्षेपणे/ अंदाज याबाबत अनिश्चितता असण्याची शक्यता आहे असे महापारेषण मा. आयोगाच्या नम्रपणे निदर्शनास आणू इच्छिते. कारण पाच वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत मापदंडात होऊ शकणारे बदल व येणारे नवे प्रवाह यांचे अचूक पणे अंदाज करणे हे काम सदर पारेषण परवानाधारक संस्थेच्या नियंत्रणा बाहेरचे काम आहे. विशेषतः वि. अमान आर्थिक घटकांचे अंदाज न करता येण्याजोगे स्वरुप तसेच तंत्रज्ञानातील प्रगती, शासकीय धोरणे व नियमावली यात दीर्घकाळात नेमके कोणते बदल होतील यासंर्वाचे अंदाज घेणे अवघड आहे.

याशिवाय महापारेषण येथे नमुद करु इच्छिते की प्रणालीची क्षमतावाढ करण्यासाठीची गरज याचे प्रक्षेपण भविष्य काळातील भार व भारप्रवाहाचे विश्लेषण यांच्या वर अवलंबुन आहे. कारण या घटकांचे स्वरुप गतीशील असते.

तसेच या संदर्भात महापारेषण कंपनीची मा. आयोगास नम्र विनंती आहे की सदर व्यवसाय योजना हा एक गतीशील दस्तऐवज आहे याची नोंद कृपया घ्यावी. कंपनीच्या बाहेरचे पर्यावरण आणि कंपनीच्या व्यवहार / कार्य यांच्यावर प्रभाव करणारे अन्य अंतर्गत घटक यानुसार कंपनीच्या वाढीवर होणारे परिणाम लक्षात घेऊन त्याला सुसंगात ठरेल याप्रमाणे व्यावसायिक योजना बऱ्याच वेळी अद्यावत व परिस्थितीनुरुप करावी लागते.

## १.३ दृष्टिकोन व पध्दति मी मांसा (Approach & Methodology)

महापारेषण कंपनीची वित्तीय प्रक्षेपणे तयार करितांना गृहीत धरले आहे की ही कंपनी एक पारेषणाची सेवा पुरविणारी संस्था म्हणून कार्यरत राहील व तिचा महसूल हा प्रामुख्याने पारेषण जाळयातील वापरकर्त्यांना दिलेल्या सेवेच्या मोबदल्यावर अवलंबून राहील.

वित्तीय वर्षे २०११-१२ ते २०१५-१६ या मुदतीच्या व्यवसाय योजनेसाठी पुढील बाबी विचारात घेण्यात येत आहेत.

- ही योजना या क्षेत्रातील अलीकडचे बदल तसेच महापारेषणने केलेले वाढीचेच प्रक्षेपण लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे.

- वि.वर्षे २०१२-१३ ते २०१६-१७ या मुदतीकरीता राज्य पारेषण संस्था (STU) यांच्या ५ वर्षांच्या पारेषण योजनेत पुरविलेल्या घटकांचा म्हणजे पारेषण गुंनवणूक योजना, वीजभराचा अंदाज, हानी कपात योजना, वीजनिर्मिती योजना इ. यांचा समावेश करण्यात आला आहे.

- वि. वर्षे २०११-१२ व २०१२-१३ यासाठी केलेली प्रक्षेपणे मा. आयोगाने दिलेला आदेश एम इ आर सी (दराच्या अटी व शर्ती) नियमावली २००५ याच्याशी सुसंगत आहेत.

- वि. वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ यासाठीची प्रक्षेपणे ही एम इ आर सी (एम वाय टी) रेग्युलेशन्स २०११ यावर आधारीत आहेत. खर्च व खेळत्या भांडवलाची गरज यांचा विचार ऐतिहासिक कल तसेच एम इ आर सी (एम वाय टी) रेग्युलेशन्स २०११ यावर आधारीत आहे. मात्र खर्चाच्या काही बाबींचा विचार करतांना, जी प्रमाणके कार्याच्या गरजा पूर्ण करण्याकरिता दाखवितात त्या प्रमाणकांचा आधार, महापारेषणने घेतला आहे.

## २. कार्य योजना

### २.१ भांडवल गुंतवणूकीची योजना CIP

भांडवल गुंतवणूक योजनेचा हेतु, महापारेषणला वि. वर्षे २०११-१२ ते २०१५-१६ या क्षितिजावरील अर्थ संकल्पीय कृतींचा सारांश

पुरविणे असा आहे. ही योजना प्रस्तावित केलेल्या गुंतवणूकीचे नियोजन आणि कार्यवाही यांच्या मार्गाची दिशा (Road Map) दर्शविते.

वि. वर्षे २०११-१२ ते २०१५-१६ यातील भांडवली गुंतवणूक योजने मध्ये [CIP] त्यातील कार्यकमांची अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवली मत्तांसाठी निधींची तरतूद केली आहे. या कार्यकमांचा तपशील दिला आहे. या कार्यकमांचा तपशील दिला आहे. सदर भांडवली गुंतवणूक योजनेत भांडवली खर्चाच्या योजना तीन श्रेणीमध्ये विभागल्या आहेत त्या म्हणजे विजेचे निर्वसन करणे, प्रणाली अधिक शक्तीशाली करणे आणि यंत्रणेच्या आयुष्य वृध्दीच्या (एल इ) योजना मात्र भांडवली खर्चाच्या योजनाच्या मंजुरीसाठी मा. आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सुत्रांनुसार, महापारेषण कंपनी अशा प्रत्येक योजनेचा तपशीलवार प्रकल्प अहवाल मा. आयोगास तत्वतः मंजुरी मिळविण्यासाठी सादर करील येथे मा. आयोगास सांगण्यात येते की, प्रस्तावित भांडवल खर्चाच्या योजनांमध्ये राज्य पारेषण संस्था (STU) यांसाठी वि.वर्षे २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या पारेषण योजनेचा समावेश केला आहे.

## २.१.१ प्रस्तावित भांडवल खर्च

महापारेषण ने प्रत्यक्ष योजनेची कार्यवाही करण्यासाठी प्रस्तावित भांडवल खर्चाचे वर्गीकरण तीन श्रेणींमध्ये केले आहे. त्या खालीलप्रमाणे

- विजेचे (निर्मिती केंद्रातून) निर्वासन करणे
- प्रणाली शक्तीशाली करण्याच्या योजना
- उपकेंद्रे
- जोडणीचे तार भाग
- ट्रान्स्फॉर्मरची संस्था वाढविणे
- ट्रान्स्फॉर्मर बदलणे
- (यंत्रणेचे) आयुष्य वाढविण्याच्या योजना (LE)
- सहाय्यभूत योजना यात वाढते अनवश्याधिकरण योजनांचा समावेश आहे.

उपरिनिर्दिष्ट योजनांच्या कार्यवाहीसाठी महापारेषण कंपनीच्या (संचालक) मंडळाने मंजूर केलेली अर्थसंकल्पिय तरतूद खालील प्रमाणे आहे.

## तक्ता क्र. १ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने वित्तीय वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ करीता प्रस्तावित भांडवली खर्च (रु. कोटीत)

| तपशील | योजनांची संख्या | वित्तीय वर्षे २०११-१२ | वित्तीय वर्षे २०१२-१३ | वित्तीय वर्षे २०१३-१४ | वित्तीय वर्षे २०१४-१५ | वित्तीय वर्षे २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| वीज निष्काषण योजना | २० | ५२१.२२ | ४७०.२५ | ६८२.६६ | ८४२.९. | ७४२.३९ |
| ट्रान्सफॉर्मर ॲडिशन | १०० | ३०२.५८ | २६५.६३ | ९२.३८ | ४४.४० | ०.०० |
| ट्रान्सफॉर्मर रिप्लेसमेंन्ट | ५५ | १६.०५ | १६१.८२ | २३.४२ | २.०० | ०.०० |
| उपकेंद्र | १४० | १२०१.९७ | ३२१९.७२ | ३१३४.०६ | ३२९२.७९ | १६७८.५८ |
| लिंक लाईन | ११९ | २१७.६३ | ५६६.५४ | ४२२.६२ | २४५.४४ | ८६९.४८ |
| लाईफ एक्सटेंशन | ७७ | ८२.१३ | २५.५२ | २००.०० | २००.०० | २००.०० |
| सहाय्भूत | ८५ | ७०.०१ | १८५.५२ | ११६.७६ | ५७.०० | ४२.०० |
| **एकूण** | **५९६** | **२,४११.५९** | **४,८९५.००** | **४,३७१.९०** | **४,६८४.५३** | **३,५३२.४५** |

## मंजूरीच्या स्थितीनुसार माहिती

(रु. कोटीत)

| तपशील | योजनांची संख्या | वित्तीय वर्षे २०११-१२ | वित्तीय वर्षे २०१२-१३ | वित्तीय वर्षे २०१३-१४ | वित्तीय वर्षे २०१४-१५ | वित्तीय वर्षे २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या योजना | ११० | १,८८८.०८ | २,९७१.७५ | १,९४८.२७ | १२४४.५६ | ८४४.४८ |
| वीज नियामक आयोगाकडे मंजूरीकरीता प्रलंबित असलेल्या योजना | १५३ | ४७३.३६ | १,४००.७६ | १,५२४.०१ | १,७६८.९४ | ५५१.७१ |
| वीज नियामक आयोगाकरिता प्रस्तावित डीपीआर योजना | ९१ | १.६४ | ३२९.०१ | १,१३८.३३ | १,६३१.०७ | १,८५२.९८ |
| विद्युत मंडळ कालावधीच्या डीपीआर योजना | १४ | ६.४६ | २.६६ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १० कोटी च्या खालील मंजूर योजना | २२८ | ४२.०५ | १९०.८२ | ६१.२९ | ३९.९६ | २८३.२८ |
| **एकूण** | **५९६** | **२,४११.५९** | **४,८९४.००** | **४,६७१.९०** | **४,६८४.५३** | **३,५३२.४५** |

## तक्ता क्र. २ नियंत्रण कालावधीतील बे आणि वाहिन्यांची लांबी (सर्कीट कि.मी.)

| तपशील | १ एप्रिल २०११ ची स्थिती | नियंत्रण कालावधीतील वर्षनिहाय बे (Bay) ची वाढ | | | | | | नियंत्रण कालावधीतील वर्षअखेरीस बे (Bay) ची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | एकूण | |
| ७६५ के.व्ही. | | ० | ० | ० | १२ | १० | २२ | २२ |
| ५०० के.व्ही. | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ४०० के.व्ही. | २३७ | ४ | ३८ | १९ | ३१ | १०२ | १९४ | ४३१ |
| २२० के.व्ही. | १४३५ | १२८ | १३१ | १९४ | १३८ | २८१ | ८७२ | २३०७ |
| १३२ के.व्ही. | १८०२ | १०७ | १४४ | २२५ | २२३ | २५९ | ९५८ | २७६० |
| ११० के.व्ही. | १७७ | ४३ | ० | ० | ० | ० | ४३ | २२० |
| १०० के.व्ही. | ३०३ | ३ | १६ | ० | १४ | ८ | ४१ | ३४४ |
| ६६ के.व्ही. | २०६ | ० | ० | ० | ० | ० | ० | २०६ |
| ३३ के.व्ही. | २७४० | २५५ | १७० | २३४ | १९८ | २३६ | १०९३ | ३८३३ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ के.व्ही. | १४३३ | ७७ | ४३ | २६ | ११८ | ४२ | ३०६ | १७३९ |
| ११ के.व्ही. | १६२८ | २४ | ० | ० | ० | ० | २४ | १६५२ |
| **एकूण** | **९९६५** | **६४१** | **५४२** | **६९८** | **७३४** | **९३८** | **३५५९** | **१३५१८** |

| तपशील | १ एप्रिल २०११ ची स्थिती | नियंत्रण कालावधीतील वर्षनिहाय वाहिन्यांच्या लांबीत (in ckt. Km) होणारी वाढ | | | | | | नियंत्रण कालावधीतील वर्षअखेरीस वाहिन्यांची लांबी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | एकूण | |
| ७६५ के.व्ही. | | ० | ० | ० | १०० | ० | १०० | १०० |
| ५०० के.व्ही. | १५०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | १५०४ |
| ४०० के.व्ही. | ६८१६ | ३७० | २६४ | ३१० | ११६० | ५४५ | २६४९ | ९४६५ |
| २२० के.व्ही. | १२५६८ | ६५१ | १०४१ | १४७१ | १४३८ | २०२४ | ६६२५ | १९१९३ |
| १३२ के.व्ही. | ११५२४ | ६५१ | ८११ | १४१८ | १८६१ | १६६० | ६४०१ | १७९२५ |
| ११० के.व्ही. | १७०० | २४ | ० | ० | ८ | २० | ५२ | १७५२ |
| १०० के.व्ही. | ६८६ | ० | २७ | ० | ५ | ६६ | ९८ | ७८४ |
| ६६ | ३२७० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३२७० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| के.व्ही. | | | | | | | | |
| ३३ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २२ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | ३८०६८ | १६९६ | २१४३ | ३१९९ | ४५७२ | ४३१५ | १५९२५ | ५३९९३ |

## तक्ता क्र. ३ नियंत्रण कालावधीतील उपकेंद्रांची संख्या व त्यांची परावर्तन क्षमता

| तपशील | १ एप्रिल २०११ ची स्थिती | नियंत्रण कालावधीतील वर्षनिहाय उपकेंद्रांची वाढ | | | | | | नियंत्रण कालावधीतील वर्षअखेरीस उपकेंद्रांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | एकूण | |
| ७६५ के.व्ही. | | ० | ० | ० | १ | १ | २ | २ |
| ५०० के.व्ही. | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४०० के.व्ही. | २१ | १ | ३ | २ | २ | ४ | १२ | ३३ |
| २२० के.व्ही. | १५८ | १३ | ११ | १५ | १२ | ११ | ६२ | २२० |
| १३२ के.व्ही. | २५२ | ९ | १० | ९ | १६ | १७ | ६१ | ३१३ |
| ११० के.व्ही. | ३३ | १ | ० | १ | ० | ० | २ | ३५ |
| १०० के.व्ही. | ३६ | ० | ० | ० | १ | १ | २ | ३८ |
| ६६ के.व्ही. | ३४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३४ |
| ३३ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २२ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **५३६** | **२४** | **२४** | **२७** | **३२** | **३४** | **१४१** | **६७७** |

| तपशील | १ एप्रिल २०११ ची स्थिती | नियंत्रण कालावधीतील वर्षनिहाय रोहित्रांची क्षमता वाढ (MVA मध्ये) | | | | | | नियंत्रण कालावधीतील वर्षअखेरीस परावर्तन क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | एकूण | |
| ७६५ के.व्ही. | | ० | ० | ० | ३००० | ० | ३००० | ३००० |
| ५०० के.व्ही. | ३५८२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३५८२ |
| ४०० के.व्ही. | १५१८० | ३५०० | ४००० | २००० | २००० | ३७३० | १५२३० | ३०४१० |
| २२० के.व्ही. | ३५६८३ | ४००० | ३३२५ | ३९०० | २७०० | ३००० | १६९२५ | ५२६०८ |
| १३२ के.व्ही. | २१९१२ | ११८८ | ४७५ | ४५० | ११०० | १००० | ४२१३ | २६१२५ |
| ११० के.व्ही. | २५४९ | १२५ | ० | ० | १०० | ० | २२५ | २७७४ |
| १०० के.व्ही. | २५७५ | १२ | ० | ० | ० | ५० | ६२ | २६३७ |
| ६६ के.व्ही. | ११३९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ११३९ |
| ३३ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २२ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ के.व्ही. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **८२६२०** | **८८२५** | **७८००** | **६३५०** | **८९००** | **७७८०** | **३९६५५** | **१२२२७५** |

## तक्ता क्र. ४ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे वित्तीय वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ करिता प्रस्तावीत भांडवलीकरण खर्च (रु. कोटीत)

| तपशील | योजनांची संख्या | योजनांची किंमत | वित्तीय वर्षे २०११-१२ | वित्तीय वर्षे २०१२-१३ | वित्तीय वर्षे २०१३-१४ | वित्तीय वर्षे २०१४-१५ | वित्तीय वर्षे २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वीज निष्काषण योजना | २० | ५७९४.१९ | ८१०.५३ | ६६३.८२ | ५६७.१० | ७२८.६९ | ७५८.७० |
| ट्रान्सफॉर्मर ॲडिशन | १०० | ३०९७.४० | ३७६.१८ | १५३.७४ | २०६.१४ | १७०.९४ | ५४.७१ |
| ट्रान्सफॉर्मर रिप्लेसमेंन्ट | ५५ | १५०६.६८ | १५.३६ | १४८.०७ | १५९.९६ | ११३.२९ | १०.१७ |
| उपकेंद्र | १४० | १२५९६.१९ | ७०५.८२ | २४२१.४४ | २०२६.९५ | २८४५.६१ | २९०६.४६ |
| लिंक लाईन | ११९ | १०७२९.६६ | १६०.०० | ३५०.३४ | ६०७.७४ | ५६६.९० | ४४१.१२ |
| लाईफ एक्सटेंशन | ७७ | १२९१.४९ | ८८.१८ | ३२.६२ | ७२.८० | १४१.८७ | २००.०० |
| सहाय्भूत | ८५ | २११७.४९ | ३९.८९ | १०४.५९ | २४२.०२ | २०३.८७ | ७७.९० |
| **एकूण** | **५९६** | **३७१३३.१०** | **२१९५.९६** | **३८७४.६२** | **३८८२.७१** | **४७७१.१७** | **४४४९.०६** |

## मंजूरीच्या स्थितीनुसार माहिती

(रु. कोटीत)

| तपशील | योजनांची संख्या | योजनांची किंमत | वित्तीय वर्षे २०११-१२ | वित्तीय वर्षे २०१२-१३ | वित्तीय वर्षे २०१३-१४ | वित्तीय वर्षे २०१४-१५ | वित्तीय वर्षे २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या योजना | ११० | १९५५०.४० | १९२२.०१ | २६६५.१४ | २३५२.०७ | २३३६.४५ | १४४६.०३ |
| वीज नियामक आयोगाकडे मंजूरीकरीता प्रलंबित असलेल्या योजना | १५३ | ९७६४.९६ | २१२.८० | १०१४.४३ | ९२७.१० | १३७८.२६ | १४२७.५२ |
| वीज नियामक आयोगाकरिता प्रस्तावित डीपीआर योजना | ९१ | ५९४२.०९ | १.५९ | ७१.२८ | ३८२.४४ | ८८४.७३ | १४७८.३३ |
| विद्युत मंडळ कालावधीच्या डीपीआर योजना | १४ | ६९९.५६ | १०.०७ | ७.६० | ६.४८ | ४.३२ | ०.०० |
| १० कोटी च्या खालील मंजूर योजना | २२८ | ११७६.०९ | ४९.४९ | ११६.१७ | २१४.६२ | १६७.४१ | ९७.१४ |
| **एकूण** | **५९६** | **३७१३३.१०** | **२१९५.९६** | **३८७४.६२** | **३८८२.७१** | **४७७१.१७** | **४४४९.०६** |

मा. आयोगा दि. १९ जुलै २०१२ रोजीच्या पत्रात व्यवसाय योजना स्थायी समिती पुढे सादर करावी असे आदेश होते. त्यानुसार स्थायी समितीच्या ९व्या बैठकीत भांडवली खर्चाची योजना सादर करण्यासाठी या वेळा स्थायी समितीच्या अध्यक्षपदी मा. संचालक (प्रवर्तन कार्य), महापारेषण होते व अन्य सदस्यांमध्ये राज्य पारेषण उपक्रम, महापारेषण, आर इन्फ्रा ही, ही पी सी ही आणि पॉवर ग्रीड यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते. ही बैठक दि. ३ ऑगस्ट २०१२ रोजी झाले. यास्तव, मा. आयोगास महापारेषणचा विनंती आहे की, त्यांनी कंपनीच्या भांडवली खर्चाच्या योजनेत कोणतेही बदल न करता त्यास मंजुरी आली.

## २.२ तांत्रिक सुधारणा योजना [TIP]

भांडवल गुंतवणूक योजनेचा एक भाग म्हणून वि. वर्षे २०११-१२ ते २०१५-१६ या मुदतीने प्रस्तादित केलेल्या भांडवली खर्चातुन नवीन तांत्रिक पध्दती उपयोगात आणण्याचा प्रस्ताव आहे. महापारेषणच्या भांडवली खर्चाच्या कार्यक्रमात प्रस्तादित केलेल्या नवीन तांत्रिक पध्दती (innovation) खालील प्रमाणे आहेत:

(ए) स्काडा / स्वंयचलीत प्रणाली SCADA/ Automation

(बी) आयुल्य वृध्दीच्या योजनांची अंमलबजावनी (LES)

(सी) रक्षण प्रणालीचे आधुमिकीकरण करणे

(डी) पूर्वनियोजित (Proactive) संचालन व सुव्यवस्था पध्दती सुरु करणे

अ) अत्याधुनिक निदान परिक्षणाची साधने वापरणे

ब) हॉट लाईन देखीभालीच्या तंत्रांचा वापर करणे

(इ) महापारेषणने शहरी भागात जी आय एस अधिष्ठित वीज

उपकेंद्रांची कार्यवाही सुरु केली आहे.

(एफ) अतिउच्च दाबाच्या पारेषण तारा उपरिपध्दतीच्या (Overhead ) आहेत त्याऐवजी भूमिगत केवल (Underground) टाकण्याची महापारेषणचा प्रभाव आहे.

जी) ४०० केव्हीच्या किंवा त्याहुन अधिक व्होस्टता असणाऱ्या इ एच ट तारांसाठी, महापारेषण आता चतुर्विध वाहक तारांचा वापर करते. (यापूर्वी जुळया वाहक तारा वापरत्या जान) यामुळे वीज हातळण्याची शक्यता दुप्पट वाढते.

एच) ४०० केव्ही आय सी टी चे प्रमाणिकरण करुन आता ५०० एम व्ही ए (३X१०५ एम व्ही ए) प्रती बँक (कोक) अशी क्षमता होती. रुपांतरणाची (ट्रान्स्फॉर्मशेनची) ६० टक्क्याने वाढविण्याचा प्रस्ताव आहे.

आय) महापारेषण कंपनी आता माहिती संग्रहणासाठी पॉवर लाईन कॅरीयर कम्युनिकेशन चा वापर करते आहे.

### २.२.१ संचालन व सुधारणा पध्दती मधील नवीन उपाय

वीज क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या विकासाचा अंगीकार करण्यासाठी त्यास योग्य अशी नवी तंत्रे व तंत्रज्ञान याचा वापर करण्यात येत आहे. तो असा:-

अ) भविष्याचा अंदाज घेऊन देखभालीची रचना करण्याच्या संकल्पना राबविणे

ब) हॉट लाईन [सचेत तार] देखभालीचे काम व सराव

क) रक्षणाच्या योजनाचे आधुनिकीकरण व बी सी यू आधारित उपकेंद्र स्वंयचलन प्रणाली पुरविणे

ड) स्मार्ट ग्रीड या पथदर्शक प्रकल्पाची कार्यवाही करणे

### २.३ प्रकाशीय वीज भू- तारेचे सर्वकण संपर्क जाळयाची रचना (Communication network OPGW wire)

महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाने दि. २३ नोव्हेंबर २०११ रोजी एक मंडळ ठराव क्र. ६८/९ केला. त्यानुसार महापारेषण कंपनीसाठी प्रकाशीय वीज भू-तार (ओ.पी.जी.डल्यू) याचा वापर करुन एक सर्वकण संपर्काच्या जाळाची रचना करण्यासाठी एक संयुक्त उपक्रम (जेव्ही) सुरु करावा. आपण त्याचे भागीदार म्हणून मेसर्स

स्टरलाईट टेक्नॉलॉजीचा लिमिटेड यांची निवड करण्यात आली. त्यानुसार त्यांना दि. १२ डिसेंबर २०११ रोजी स्वीकाराचे पत्र (LOA) देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने त्यांचे पत्र क्र. जे.व्ही.पी इ २०११/ पी. क. ३१४/ ऊर्जा- ४ दि. २० मार्च २०१२ नुसार या प्रकल्पास मंजुरी दिली.

कामाची व्याजी: महाराष्ट्रात ४८ तंतूमय प्रकाशिय वीज भू-तार केबल स्थापित करणे. त्यात महापारेषण कंपनीच्या पुढील गरजांना प्राधान्य देणे:-

१) महापारेषणसाठी सदर ओ.पी.जी.डल्यू २८०१ किमीच्या मार्गावर असेल.

२) महापारेषसाठी १०० किमीच्या मार्गांवर जोडणी केबल देणे.

३) महापारेषसाठी अग्रकमाने एस.डी.एच आणि एम.यू.एक्स या साहित्याचे ५० संच पुरविणे.

४) महापारेषणच्या गरजांचा समावेश करणारी नेटवर्क व्यवस्थापतन प्रणाली तयार करणे.

हे काम संयुक्त उपक्रम कंपनी (जेव्हा) करील. हा प्रकल्प मार्च २००४ दरम्यान पूर्ण करण्याचे वेळापत्रक आहे.

## २.४ भांडवल गुंनवणूक व तांत्रिक सुधारणा योजनांचा वित्तीय पुरवठा (Financing of CIP and TIP)

भांडवली खर्चाच्या वीत्त पुरवठयासाठी, महापारेषण प्रामुख्याने वित्तीय संस्थांकडून दीर्घ मुदतीच्या कर्जावर अवलंबून राहील. नियंत्रणाच्या कालावधीसाठी प्रक्षेपित केलेल्या भांडवल खर्चाच्या सुमारे २० टक्के भागाची उभारणी इक्विटी (समभाग) मार्फत (अंतर्गत उपार्जनासह) आणि उर्वरित (सुमारे ८० टक्के) गरज दीर्घ- मुदतीच्या कर्जातून पूर्ण करण्याचा प्रस्ताव आहे. महापारेषणचा आपल्या भांडवली खर्चाच्या योजनांचा विधी अंतर्गत व परदेशी वित्त संस्था मार्फत उभारण्याचा प्रस्ताव आहे. अंतर्गत संस्था म्हणजे वीज वित्त महामंडळ, (PFC) ग्रामीण विदयुतीकरण कंपती लि. (REC) आणि बँक ऑफ महाराष्ट्र (BOM), युनीयन बँक ऑफ इंडिया (UBI) इ. आणि परदेशी वित्तीय संस्था म्हणजे जे आय सी ए, जागतिक केंद्र, डी बी व आय एफ सी. इ.

महापारेषण स्थानिक उपलब्ध बँकाकडुन निधीची व्यवस्था करते. महापारेषण ही शासकीकय व सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय उपयुक्त सेवा देणारी संस्था असल्याने तसेच तिचे परतफेडीचा इतिहास चांगला आल्याने तिला रास्त दरात कर्जे मिळतात. महापारेषण येथे नम्रपणे सांगू इच्छिते की निधी उभारण्यासाठी दि. कंपनी (REC) आणि वीज वित्त महामंडळ या वित्तीय संस्थाकडे जाण्यात येईल.

## २.५ दुसऱ्या नियंत्रण मुदतीसाठी खर्चाचे प्रक्षेपण

### २.५.१ संचालन व सुव्यवस्था खर्च (सं.व.सु. खर्च)

#### २.५.१.१ वि. वर्षे २०११-१२ व २०१२-१३ साठी सं.व.सू. खर्च

मा. आयोगाने, प्रकरण क. १६९ वर्ष २०११ चे, यावर दिलेल्या आपल्या आदेशात विर्षे २०११-१२ व २०१२-१३ दरम्यान संचालन व सुव्यवस्थेच्या खर्चाच्या अंदजाच्या हेतुसाठी चलनवाढीचा दर ढोक किंमत निर्देशांक (WPI) आणि ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) या आधारे हिशेबात घेतला आहे. त्यास अनुसरुन महापारेषणने वि.वर्षे २०११-१२ व २०१२-१३ चे निव्वळ सं.व.सू खर्चाचे प्रक्षेपण करतांना वि.वर्ष २०१०-११ करीता निव्वळ सं.व.सू खर्च (लेखापरिक्षित) यासाठी चलनवाढीचे दर लावले आहेत.

योग्य चलनवाढ निर्देशांकाच्या गणनेकरीता, महापारेषणने जाहीर उपलब्ध मागील माहतीच्या आधारे तीन वर्षाची प्रत्येक मुद्यातील चलनवाढ हिशेवात घेतली आहे. महापारेषणचे असे मत आहे की तीत वर्षाच्या कालावधाला विचार केल्यास चलनवाढीच्या निर्देशांकांच्या हालचाली संबंधाच्या अलीकडच्या कलांचे योग्य प्रकारे समावेशन होते. त्यामुळे ते भविष्यातील हालचालीचे अंदाज करण्यासाठी पुरेसे आहेत.

वित्तीय वर्ष २०१०-११ साठीच्या निव्वळ सं.व.सू खर्चाकरीता (लेखापरिक्षित आकडेवारी) लावलेल, चलनवाढीला निर्देशांक वि.वर्षे

२०११-१२ व २०१२-१३ च्या सं.व.सू. खर्चाच्या निव्वळ अंदाजाबेट खालीलप्रमाणे करण्यास पुरेसा आहे.

**तक्ता क्र. ५ चलनवाढीच्या घटकाच्या आधारे मोजनी केलेले निव्वळ सं.व.सू. खर्च (रु.कोटीत)**

| अनु. क्र. | तपशील | वि.वर्ष २०१०-११ | वि.वर्ष २०११-१२ | वि.वर्ष २०१२-१३ |
|---|---|---|---|---|
| १. | कर्मचारी खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ) | ५२१.२४ | ५७२.७१ | ६२४.१४ |
| २. | ए ॲंड जी खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ) | १३०.६० | १४३.७४ | ३५२.२१ |
| ३. | रु नुतनीकरण व आधुनीकिकरण खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ) | २८७.०० | ३१७.९४ | ३५२.२१ |
| **४.** | **एकूण सं.व.सू खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ)** | **९३८.८४** | **१,०३४.३८** | **१,१३४.५४** |

वरील मुल्यांमध्ये स्थगीत सं.व.सू खर्चाचा समावेश नाही

**२.५.१.२ वित्तीय वर्ष २०१३-१४ पासून वित्तीय वर्ष २०१५-१६ पर्यंतचे संवसु खर्च**

विद्यमान केंद्रांच्या (Stations) प्रमाणकानुसार सं व सु खर्चाच्यासाठी खालील बाबींना मा.म.वि.नि. आयोगाची बहूवर्षीय दराची नियमावली २०११ नुसार करारानिर्दिष्ट परवानगी आहे.

२०११-१२ व २०१२-१३ च्या सं.व.सू. खर्चाच्या निव्वळ अंदाजाबेट खालीलप्रमाणे करण्यास पुरेसा आहे.

**तक्ता क्र. ५ चलनवाढीच्या घटकाच्या आधारे मोजनी केलेले निव्वळ सं.व.सू. खर्च (रु.कोटीत)**

| अनु. क्र. | तपशील | वि.वर्ष २०१०-११ | वि.वर्ष २०११-१२ | वि.वर्ष २०१२-१३ |
|---|---|---|---|---|
| १. | कर्मचारी खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ) | ५२१.२४ | ५७२.७१ | ६२४.१४ |
| २. | ए ॲड जी खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ) | १३०.६० | १४३.७४ | ३५२.२१ |
| ३. | रु नुतनीकरण व आधुनीकिकरण खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ) | २८७.०० | ३१७.९४ | ३५२.२१ |
| **४.** | **एकूण सं.व.सू खर्च (भांडवलीकरणाची निव्वळ)** | **९३८.८४** | **१,०३४.३८** | **१,१३४.५४** |

वरील मुल्यांमध्ये स्थगीत सं.व.सू खर्चाचा समावेश नाही

## २.५.१.२ वित्तीय वर्ष २०१३-१४ पासून वित्तीय वर्ष २०१५-१६ पर्यंतचे संवसु खर्च

विद्यमान केंद्रांच्या (Stations) प्रमाणकानुसार सं व सु खर्चाच्यासाठी खालील बाबींना मा.म.वि.नि. आयोगाची बहूवर्षीय दराची नियमावली २०११ नुसार करारानिर्दिष्ट परवानगी आहे.

### ६१.५ संचालन व सुव्यवस्था खर्च

...

...

### ६१.६ विद्यमान पारेषण अनुज्ञप्तीधारक

| व्होल्टता स्थर | द्वितीय नियंत्रण कालावधी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| अ.उ.दा. वाहिन्यांकरिता रु. लाख/ सर्कीट कि.मी. | | | | | |
| एच व्ही डी सी | १४९२ | १५७७ | १६६७ | १७६३ | १८६३ |
| ७६५ के.व्ही. | ०.७४ | ०.७८ | ०.८३ | ०.८८ | ०.९३ |
| ४०० के.व्ही. | ०.५३ | ०.५६ | ०.५९ | ०.६३ | ०.६६ |
| ६६ के.व्ही. वरील व ४०० के.व्ही. पर्यंत | ०.२१ | ०.२२ | ०.२४ | ०.२५ | ०.२६ |
| ६६ के.व्ही. व त्याखालील | ०.१३ | ०.१४ | ०.१४ | ०.१५ | ०.१६ |
| पारेषण बे करिता रु. लाख/ प्रति बे | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७६५ के.व्ही. | १३१.२४ | १३८.७५ | १४६.६८ | १५५.०७ | १३६.९४ |
| ४०० के.व्ही. | ९३.७५ | ९९.११ | १०४.७८ | ११०.७८ | ११७.११ |
| ६६ के.व्ही. वरील व ४०० के.व्ही. पर्यंत | १३.९९ | १४.३६ | १५.१९ | १६.०६ | १६.९७ |
| ६६ के.व्ही. व त्याखालील | २.८४ | ३ | ३.१७ | ३.३६ | ३.५५ |

---

महापारेषण कंपनी नमुद करु इच्छिते की, मा. आयोगाने सं.व सु. खर्चाची प्रमाणके सुचविण्यासाठी अवलंबलेली पद्धती मीमांसा महापारेषणचे प्रत्यक्ष सं. व सु. खर्चाचा समावेश करण्यास न्याय्य जरी असली तरी अंतीम नियमानासाठी विनिर्दिष्ट केलेली प्रमाणके (ते खर्च) समावेश करीत नाहीत. याशिवाय यासाठी कोणतीही माहिती सादर करण्याचे महापारेषणला सांगण्यात आले नव्हते किंवा प्रमाणके निश्चित करण्याकरिता महापारेषणशी कुठलीही चर्चाही करण्यात आली नव्हती.

वि. वर्षे २००६ ते २०११ या काळात, महापारेषणच्या वीज जाळ्यातील रुपांतर करण्याच्या क्षमतेत ४८ टक्के वाढ झाली. महापारेषणच्या एकूण मत्तांचे आकारमानात लक्षणीय वाढ झाली. मा.

आयोगाने २००६ हे आधार वर्ष ठरविल्यामुळे महापारेषणच्या लक्षणीय प्रमाणात वाढलेल्या भत्तांचे आकारमान लक्षात घेतल्यास, सं व सु खर्चातील वाढता खर्चाच्या प्रश्नाचा योग्य विचार झालेला नाही.

याशिवाय महापारेषण नम्रपणे सांगू इच्छिते की, बहूवर्षीय नियमावली २०११ यात दिलेली प्रमाणके (Norms) हि वाढले. WPI I CPI या निर्देशांकामुळे होणाऱ्या इच्छित वाढीची भरपाई करण्यास अपुरे आहेत. याशिवाय यापूर्वीच्या म.रा.वि.मं. च्या युगात नुतनीकरण व आधुनिकीकरण यांचे (R & M) खर्च हे कमी होते. म्हणन वि. वर्षे २०१३ ते २०१६ यासाठी प्रमाणके निश्चित करण्यासाठी सध्याच्या चालू स्तराचे सं व सु खर्च वापरणे अत्यावश्यत आहे.

एवढेच नव्हे तर येथे वस्तुस्थिती विचारात घेतली पाहिजे. महापारेषण कंपनी महाराष्ट्र राज्यातील सर्वाम जुनी असलेली वीज पारेषणाच्या जाळ्याची मत्ता अजूनही वापरत आहे. या जाळ्यातील विविध व्होल्टेज लेव्हलची साधन सामग्री उपयुक्त आयुष्य यापूर्वीच ओलांडले आहे. म्हणून महापारेषण नम्रपणे नमूद करु इच्छिते की, मा. आयोगाने परवानगी दिलेले नुतनीकरण व आधुनिकीकरण (R & M) यांचे खर्च हे विनंतीकाराच्या गेली कित्येक वर्षांतील आर अँड एम खर्चाच्या गरजा पूर्ण करु शकत नाहीत.

पायाभूत भत्ता आता जुन्या झाल्या आहेत व पारेषणाच्या नव्या भत्तांच्या किंमतीजास्त आहेत, त्यामुळे आर अँड एम हे खर्चांत वाढ झ ाली आहे.

म.वि.मि. आयोग (बहूवर्षीय दर) नियमावली २०११ ही आरइन्फ्रा टी व टी पी सी-टी यांनाही सं व सु ची प्रमाणके पुरविते. परंतु या दोघांच्या तुलनेत महापारेषणला मंजूर केलेल्या प्रमाणकांमध्ये खूप फरक आहे.

वरील सर्व बाबींशिवाय दर पाच वर्षात कराव्या लागणाऱ्या वेतन कराराचाही विचार करणे आवश्यक आहे. वेतन करार ही नियंत्रण नसलेली बाब आहे. महागाईच्या घटकांमध्ये त्याचा समावेश केलेला नाही. बहूवर्षीय दराच्या नियमावली २०११ यात वेतनकराराचा सं व सु प्रमाणकांवर पडणारा प्रभाव समाविष्ट केलेला नाही.

म्हणून मा. आयोगाला महापारेषण कंपनीची नम्र विनंती आहे की, त्यांनी म.वि.नि. आयोग (बहूवर्षीय दर) नियमावली २०११ यात निर्देशित केलेल्या प्रमाणकांचा आढावा घ्यावा व दुसऱ्या नियंत्रण

मुदतीतील प्रमाणकानुसार असणाऱ्या व अपेक्षित सं व सू खर्च यांच्यातील तफावतीचा विचार करावा. मात्र महापारेषण कंपनीने तिने सादर केलेल्या विनंतीस बाधा न आणता, वि. वर्ष १३-१४ व वि.वर्ष १५-१६ च्या प्रमाणकानुसारी सं व सु खर्चाचा विचार केला आहे.

याशिवाय महापारेषण कंपनी मागील वर्षातील स्थगित ठेवलेली परंतु वि. वर्षे ११-१२ व १२-१३ मध्ये देय असलेल्या देण्यांचाही दावा करील. अशाप्रकारे वि. वर्षे ११-१२ व वि. वर्षे १५-१६ या मुदतीतील सं व सु खर्चाचा विचार वार्षिक महसूलाची गरजेचाि हशेंब करतांना खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

**तक्ता क्र.६ : संचालन व सुव्यवस्था खर्चाचे प्रक्षेपण (रु. कोटीत)**

| **तपशील** | **वि.वर्ष २०११-१२** | **वि.वर्ष २०१२-१३** | **वि.वर्ष २०१३-१४** | **वि.वर्ष २०१४-१५** | **वि.वर्ष २०१५-१६** |
|---|---|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च | १०३४.३८ | ११३४.५४ | १३३९.०२ | १५३८.९० | १८२४.४६ |
| इतर दावे | ४१.४७ | ४१.४७ | | | |
| **एकूण** | **१०७५.८५** | **११७६.०१** | **१३३९.०२** | **१५३८.९०** | **१८२४.४६** |

## २.५.२. व्याज आणि वित्तीय आकार

कर्ज समभाग गुणोत्तर (डेट-इक्विटी रेशियो) महापारेषण आपल्या भांडवली खर्चाच्या गरजेचा निधी कर्ज : समभाग गुणोत्तर ८० :२० यातून करावयाचे ठरविले आहे.

कर्जाची स्त्रोते : महापारेषणचे प्रथम एल.आय.सी., जे.आय.सी.ए., आय.एफ.सी., बँक ऑफ महाराष्ट्र आणि ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स यांच्याकडून घेतलेल्या विद्यमान कर्जाच्या करारांचा विचार केला. उर्वरित निधीची गरज ही आर.इ.सी व पी.एफ.सी. यांच्याकडून मिळविली जाईल व ८०:२० या गुणोत्तरानुसार कर्जाची गरज पूर्ण होईल.

**तक्ता क्र.७ : अंदाजे घेतली जाणारी कर्जे (रु. कोटीत)**

| अनु.क्र. | तपशील | वि.वर्ष २०११-१२ | वि.वर्ष २०१२-१३ | वि.वर्ष २०१३-१४ | वि.वर्ष २०१४-१५ | वि.वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भांडवली खर्च | २४११.५९ | ४८९५.०० | ४६७१.९० | ४६८४.५३ | ३५३२.४५ |
| २. | भांडवली करण | २१९५.९६ | ३८७४.६२ | ३८८२.७१ | ४७७१.१७ | ४४४९.०६ |
| ३. | घ्यावयाचे कर्ज | २०४१.१२ | ३९१६.०० | ३७३७.५२ | ३७४७.६२ | २८२५.९६ |

* वि.वर्ष २०११-१२ ची आकडेवारी हंगामी असून ती सुधारणेच्या अधीन असेल.

**व्याजाचा दर** : व्याजाच्या खर्चाच हिशेब करण्याकरिता पी.एफ.सी. व आर.इ.सी. यांच्या कर्जाचा विद्यमान १२.२५ टक्के हा दर गृहित धरला आहे. इतर संस्थांसाठी हा कर्ज घेण्याचा तपशील परतफेडीचे वेळापत्रक आणि व्याज दर यांची माहिती फॉर्म-६ मध्ये दिली आहे.

**भत्तांच्या निवृत्तीमुळे व्याज खर्चात कपात :**

महापारेषणने असे विचारात घेतले आहे की, प्रत्येक वर्षी ८० टक्के जुनी भत्ता, त्या वर्षातील कर्जाची रक्कम कमी करण्यासाठी निवृत्त होईल. याशिवाय महापारेषणने संबंधित वर्षांत कर्जाची रक्कम कमी झाल्याने व्याजाच्या खर्चात कपात करण्यासाठी १२.२५ टक्के दर लागू केला आहे.

व्याजाच्या खर्चाचे भांडवलीकरण करण्यासाठी महापारेषणने संबंधित वर्षातील प्रगतीपथावरील कामे बंद करण्याचा दर ११.५ टक्के असा विचारात घेतला आहे. व्याज खर्चाच्या भांडवलीकरणाची लेखा नोंद केल्यानंतर व इतर व्याज व वित्तीय आकार घेतल्यावर महापारेषणला उपर्निर्दिष्ट मुदतीसाठी बंधनकारक असणारे एकूण व्याज आणि वित्तीय आकार यांचे प्रक्षेपण खालीलप्रमाणे राहील.

**तक्ता क्र.८ : व्याज व वित्तीय आकारांचे प्रक्षेपण (रक्कम रु. कोटीत)**

| **तपशील** | **वि.वर्ष २०११-१२** | **वि.वर्ष २०१२-१३** | **वि.वर्ष २०१३-१४** | **वि.वर्ष २०१४-१५** | **वि.वर्ष २०१५-१६** |
|---|---|---|---|---|---|
| निव्वळ व्याज खर्च (भांडचलीकरणानंतर) | ३५३.७१ | ५१२.६६ | ७८२.६५ | ११०६.४५ | १४२३.२७ |
| इतर व्याज व वित्तीय खर्च | १५.९० | २२.५८ | २१.८४ | २२.०५ | १७.६० |
| **एकूण व्याज व वित्तीय आकार** | **३६९.६०** | **५३५.२४** | **८०४.४९** | **११२८.४९** | **१४४०.८७** |

वित्तीय वर्ष २०११-१२ व वि. वर्ष २०१२-१३ मधील इतर व्याज व वित्तीय आकार याबाबत, महापारेषणने मा. आयोगाचे दि. १८ मे, २०१२ रोजी दिलेल्या आदेशात मंजूर केलेले हमी व वित्तीय आकार विचारात घेण्यात आले आहेत. वि.वर्षे २०१३-१४ व वि. वर्षे २०१५-१६ करिता मा. आयोगाने वि. वर्षे २०१२-१३ साठी दि. १८ मे, २०१२ च्या आदेशाप्रमाणे मंजूरीत हमी आकारात ५ टक्के वाढ हिशोबात घेतली आहे.

महापारेषणने वित्तीय वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ करीता मा.आयोगाने दिनांक १८ मे, २०१२ च्या आदेशात अनुसरलेल्या पद्धती मीमांसेनुसार संबंधित वर्षात घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या ०.५ टक्के वित्तीय आकार हिशोबात घेतले आहेत.

## <u>२.५.३.</u> <u>भत्ता आणि घसारा :</u>

महापारेषणने वि.वर्षे २०११-१२ व २०१२-१३ यातील भत्तांचे वर्गीकरण व घसारा यांची मोजणी करतांना मा. आयोगाची दर नियमावली, २००५ यांच्या अनुसुचित दिलेल्या घसारा दरांचा वापर केला आहे. महापारेषणने त्यानंतर दुसऱ्या नियंत्रण मुदतीकरिता घसाऱ्याची मोजणी मा.म.वि.नि. आयोगाची (बहुवर्षीय दर) नियमावली २०११ यांत दिलेल्या घसाऱ्यांच्या दराप्रमाणे केली आहे. मा. आयोगाने वर्षातील परतफेडीच्या रक्कमेची जोडणी मान्यता दिलेल्या घसाराच्या रक्कमेशी केली आहे. उपरनिर्दिष्ट तरतुदींशिवाय घसाऱ्यांचे दरात सुधारणा करुन घसाऱ्यासाठी अग्रीम द्यावयाची तरतूद काढून टाकली आहे.

तक्ता क्र.८ : व्याज व वित्तीय आकारांचे प्रक्षेपण (रक्कम रु. कोटीत)

| तपशील | वि.वर्ष २०११-१२ | वि.वर्ष २०१२-१३ | वि.वर्ष २०१३-१४ | वि.वर्ष २०१४-१५ | वि.वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| निव्वळ व्याज खर्च (भांडचलीकरणानंतर) | ३५३.७१ | ५१२.६६ | ७८२.६५ | ११०६.४५ | १४२३.२७ |
| इतर व्याज व वित्तीय खर्च | १५.९० | २२.५८ | २१.८४ | २२.०५ | १७.६० |
| **एकूण व्याज व वित्तीय आकार** | **३६९.६०** | **५३५.२४** | **८०४.४९** | **११२८.४९** | **१४४०.८७** |

वित्तीय वर्ष २०११-१२ व वि. वर्ष २०१२-१३ मधील इतर व्याज व वित्तीय आकार याबाबत, महापारेषणने मा. आयोगाचे दि. १८ मे, २०१२ रोजी दिलेल्या आदेशात मंजूर केलेले हमी व वित्तीय आकार विचारात घेण्यात आले आहेत. वि.वर्षे २०१३-१४ व वि. वर्षे २०१५-१६ करिता मा. आयोगाने वि. वर्षे २०१२-१३ साठी दि. १८ मे, २०१२ च्या आदेशाप्रमाणे मंजूरीत हमी आकारात ५ टक्के वाढ हिशोबात घेतली आहे.

होईल. दुसऱ्या प्रकारे महापारेषण तिच्यावरील परतफेडीच्या बंधनाची पूर्तता करण्यास असमर्थ होईल त्याचा अनिष्ट परिणाम महापारेषण कंपनीच्या प्रतिमेवर होईल. म्हणून मा. आयोगाला महापारेषणची प्रार्थना आहे की, त्यांनी प्रत्येक वर्षात मागणी केलेल्या घसाऱ्या इतकी परतफेड करण्याचे बंधन घालू नये. त्याऐवजी त्यांनी महापारेषणने सदर वर्षी घसाऱ्या पोटीच्या अग्रीमाची जी मागणी केली असती त्याच्यापेक्षा केलेल्या जास्त प्रत्यक्ष परतफेड इतका घसारा असायचा, दावा करण्यास महापारेषणला परवानगी द्यावी.

याला एक पर्याय म्हणून मा. आयोगाने घसाऱ्यासाठी अग्रीमाची तरतूद या ऐवजी तेच घसारा दर मंजूर करावेत. मात्र त्यांनी प्रमाणशीर समभाग म्हणून हिशेबात धरलेल्या निधीच्या १० टक्के शिलकीवर १५.५ टक्के (आर ओ इ) परतावा यास मंजूरी द्यावी. हा विचार बहूवर्षीय दर नियमावली (MYT) २०११ यातील घसारा दर कर्ज व समभाग याचे गुणोत्तर ७०:३० असे हिशेबात धरण्याशी सुसंगत असेल. प्रत्यक्षात महापारेषणने भांडवली खर्चाचा निधी, कर्ज व समभाग यांचे गुणोत्तर ८०:२० असे धरुन, उभारण्याचे योजले आहे.

## २.५.४ खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामत यावर व्याज :

महापारेषणने खेळत्या भांडवलाच्या गरजेचा हिशेबा मा. आयोगाने म.वि.नि. आयोग (बहूवर्षीय दर) नियमावली २०११ यात विहित केलेल्या प्रमाणकी करणाच्या मापदंडानुसार केला आहे. भारतीय अर्थव्यवस्था मळसूत्री (Spiral) चलनवाढ अनुभवत आहे. त्यामुळे व्याज दराचे चक्र निश्चितपणे चढत्या दिशेने जात आहे. कारण बेंकांनी त्यांचा मुख्य कर्ज दर वाढविले आहेत. महापारेषणने खेळत्या भांडवलाच्या व्याजाचा विचार करण्यासाठी स्टेट बँकेचा सध्याच्या अल्प मुदतीसाठी असलेला मुख्य व्याजदी (पीएलआर) १४.७५ टक्के गृहित धरला आहे. मा. आयोगाने सुद्धा आपला आदेश क्र.१६९ वर्ष २०११ यात खेळत्या भांडवलासाठी हाच दर विचारात घेतला आहे.

## २.५.५ समभागावर परतावा

महापारेषण नमूद करु इच्छिते की, वि.वर्षे २०११-१२ ते वि.वर्ष २०१५-१६ या कालावधीसाठी भांडवलीकरण प्रस्तावित करण्याकरिता समभागाचे योगदान (वर्गणी) २० टक्के राहील असे विचारात घेतल आहे. म.वि.वि.आयोग (बहुवर्षीय दर) नियमावली २०११ यानुसार वि.वर्षे २०११-१२ व २०१२-१३ साठी आर ओ इ ची मागणी केली आहे. तर वि. वषे्र २०१३-१४ पासून २०१५-१६ पर्यंतच्या मुदतीसाठी

म.वि.वि.आयोग (बहुवर्षीय दर) नियमावली २०११ यानुसार आर ओ इ ची मागणी केली आहे.

मात्र मा. आयोगाला महापारेषणची प्रार्थना आहे की त्यांना केंद्र व विद्युत नियामक आयोग यांच्या (दराच्या अटी व शर्ती) नियमावली २००९-१४ यांस अनुसरुन कर-पूर्व आर ओ टू मंजूर करावा:

**२.५.६ इतर खर्च**

**२.५.६.१ इतर खर्च**

महापारेषणने वि.वर्ष २०११-१२ मध्ये कराव्या लागणाऱ्या खर्चाचा अंदाज २ टक्के या नाममात्र दराने वाढविल आहे. भविष्यातील कालावधीच्या विचारकरता पूर्व कालिन समायोजने व विलिपय दरातील बदलामुळे होऊ शकणारी हानी या बाबी विचारात घेतलेल्या नाहीत.

**२.५.६.२. आकस्मिक राखीव**

म.वि.नि.आयोग (बहुवर्षीय दर) नियमावली २०११, यातील तरतुदीनुसार महापारेषणची आकस्मिक राखीव ठोक म्हणुन ०.२५ टक्के एवढी आरंभिक रक्कम विचारात घेतली आहे.

**२.५.६.३. प्राप्ती कर**

म.वि.नि. आयोग दर नियमावली २००५ नुसार महापारेषणने वि.वर्षे २०११-१२ व २०१२-१३ साठी प्राप्तीकरासाठी ए आर आर चा भाग म्हणून मागणी केली आहे. वि. वर्ष २०१३ नंतर महापारेषण

म.वि.नि. आयोग (बहुवर्षीय दर) नियमावली २०११ यानुसार ए आर आर बाहेर वेगळा अशा प्रकारे प्राप्तीकरनी मागणी केल आहे.

## २.५.७. दराव्यतिरिक्त उत्पन्न (N.T.I.)

महापारेषणने वि.वर्ष २०११-१२ अंदाजाच्या आधारीत व्याजाचे उत्पन्न वगळून दरव्यतिरिक्त उत्पन्नातील घटकांमध्ये २ टक्के नाममात्र वाढ गृहीत धरली आहे. आकस्मिक राखीव निधीवरील व्याजाच्या उत्पन्नाचा अंदाज करण्यासाठी सरासरी व्याज दर (आठ) टक्के (शासकीय प्रतिभूती) या दराने विविध वर्षातील आकस्मिक राखीव निधीवरील शिल्लकीवरील व्याजासाठी विचारात घेण्यात आले आहे. वि.वर्ष २०११-१२ करीता इतर गुंतवणूकीवरील अपेक्षित व्याज उत्पन्न, जे संपूर्ण नियंत्रण मुदतीकरीता मिळेल त्याची भविष्यात गुंतवणूक सरकारी प्रतिभूतीमध्ये करण्याची शक्यता आहे.

## २.५.८.गोवा राज्यांकडुन यंत्रणा वापराचे मिळालेले उत्पन्न

महापारेषणने वि.वर्षे २०१०-११ मध्ये गोवा राज्याकडून मिळालेल्या व्हिलींगचार्जेस मध्ये कोणतीही वाढ होईल असा विचार केलेला नाही.

## २.६ वित्तीय वर्ष २०११-१२ साठी महसुलातील अंतर

मा. आयोगाने प्रकरण क. १६९ वर्ष २०११ यातील दि. १८ मे २०१२ च्या आदेशानुसार वि.वर्ष २०११-१२ साठी वार्षिक महसूल गरजेसाठी (ARR) एकूण रु. २४८५.५८ कोटी आणि यावर्षासात

अंदाजित महसूल रु. २२६४.२८ कोटी यास मंजूरी दिली आहे. वि.वर्ष २०११-१२ साठी महसूलातील अंतर रु. २२१.३ कोटी अशा मंजूर केली आहे. व वि.वर्ष २०११-१२ पर्यंत संचयी महसूलातील अंतर रु. ७५९.५५ कोटी अशी मंजूर झाली होती.

मात्र वि.वर्ष २०११-१२ साठी हंगामी महसुलातील अंतर रु. ५९५.३७ कोटी व वि.वर्ष २०११-१२ पर्यंत संचयी महसुलातील अंतर इतकी आहे. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे :-

**तक्ता क. ९ संचयी महसूल अंतर (रु. कोटीत)**

| **वि.वर्ष २०११-१२** | |
|---|---|
| तपशील | रु. कोटीत |
| नक्त वार्षिक महसूलाहची गरज | २८५९.६५ |
| पारेषण दरापासूनचा महसूल | २२६४.२८ |
| सदर वर्षासाठी एकल अंतर (हंगामी) | (५९५.३७) |
| संचयी अंतर वि.वर्ष २०१०-११ पर्यंतचे | (५३८.२५) |
| **सदर वर्षासाठी संचयी अंतर** | **(११३३.६२)** |

महापारेषणच्या या संचयी महसूलातील अंतराचा विचार करताना मा. आयोगाने वि.वर्ष २०१२-१३ मधील वार्षिक महसूलाच्या गरजेत (ARR) क. ७५९.५५ कोटीच्या अंतरास मंजूरी दिली आहे. उर्वरित रु. ३७४.०७ कोटीची रक्कम वि.वर्ष २०१३-१४ च्या वार्षिक महसूलाच्या गरजेमध्ये पुढे नेण्यांस (Carry Forward) आली आहे.

## ३. वार्षिक महसूल गरजेचे प्रक्षेपण

**तक्ता क्र. १० यापूर्वीच्या विभागात केलेल्या चर्चेच्या आधारे नियंत्रण मुदतीसाठी वा.म. गरजेचे (ARR) अंदाज पुढील तक्त्यात दिले आहेत.**

(रु. कोटीत)

| अनु.क्र. | तपशिल | प्रक्षेपित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वि.वर्ष१२ | वि.वर्ष१३ | वि.वर्ष१४ | वि.वर्ष१५ | वि.वर्ष१६ |
| १. | संचालन व सुव्यवस्था खर्च | १,०७५.८५ | १,१७६.०१ | १,३३९.०२ | १,५३८.९० | १,८२४.४६ |
| २. | घसाऱ्याचा खर्च | | | | | |
| अ) | घसारा | ४६७.४७ | ५५३.३१ | ११०४.९७ | १३१८.६३ | १५४५.६९ |
| ब) | घराऱ्यासाठी अग्रीम | २७७.६७ | ४२५.५१ | ३०.१९ | ०.०० | ३४.७८ |
| ३. | दीर्घ मुदतीच्या कर्जावर व्याज | ३५३.७१ | ५१२.६६ | ७८२.६५ | ११०६.४५ | १४२३.२७ |
| ४. | खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामत रकमेवरील व्याज | ६८.६७ | १०१.०७ | १००.५२ | १११.७१ | १३४.१० |
| ५. | इतर व्याज व वित्तीय आकार | १५.९० | २२.५८ | २१.८४ | २२.०५ | १७.६० |
| ६. | इतर खर्च | ५९.४६ | १.१८ | १.२१ | १.२३ | १.२६ |
| ७. | प्राप्ती कर | १५४.९८ | ५३१.१२ | | | |
| ८. | आकस्मिक राखीव साठी योगदान | ३४.६५ | ३९.७३ | ४८.८५ | ५८.०१ | ६९.२९ |
| **९.** | **एकूण महसूली खर्च** | **२,५०८.३५** | **३,३६३.१७** | **३,४२९.२५** | **४,१५६.९८** | **५,०५०.४६** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १०. | समभाग भांडवलावर परतावा | ५५६.५८ | ६३६.१२ | ८१७.६५ | ९४४.३७ | १०७८.४४ |
| **११.** | **एकूण महसूलाची गरज** | **३,०६४.९३** | **३,९०९.२९** | **४,२४६.९०** | **५,१०१.३५** | **६,१२८.९०** |
| १२. | वजा - दराव्यतिरिक्त उत्पन्न | १८४.७५ | १९१.०९ | १९८.०६ | २०५.८३ | २१४.४९ |
| १३. | वजा - गोवा राज्याचे व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न | २०.५२ | २०.५२ | २०.५२ | २०.५२ | २०.५२ |
| १४. | मागील अंतराची वसूली | | ७५९.५५ | ३७४.०७ | | |
| **१५.** | **एकूण महसूल गरज पारेषण दरापासून** | **२८५९.६५** | **४५४७.२३** | **४४०२.३९** | **४८७५.००** | **५८९३.८९** |

महापारेषण मा. आयोगास नम्रपणे विनंती करते की वि. वर्षे २०११-१२ ते २०१५-१६च्या व्यवसाय योजनेतील वरील ARR ला मंजूरी आली. वि.वर्ष २०१४ ते १६ यासाठी प्राप्ती कराचे दाखिल वरील ARR व्यतिरिक्त संबंधित वर्षात मंजूर करावे, त्याची माहिती पुढील भागात दिली आहे.

## ३.१ वि.वर्ष २०१३-१४ ते वि.वर्ष २०१५-१६ साठी प्राप्तीकर

मा. म.वि.नि.अयोग (बहूवर्षीय दर ) नियमावली २०११ यातील नियमक ३४ यात वेगळया लेखा शीर्षाखाली प्राप्ती करच्या बाबत तरतूद करण्यात आली आहे. ती वार्षिक महसूलाच्या गरजेचा भाग नाही. महापारेषण मा. आयोगास विनंती करते की, वि. वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ करीता खालील तक्त्यान दर्शविल्याप्रमाणे प्राप्ती कर मंजूर करावा.

**तक्ता क्रं. ११ प्राप्ती कर (रु. कोटीत)**

| तपशील | वि.वर्ष २०१३-१४ | वि.वर्ष २०१४-१५ | वि.वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|
| प्राप्ती कर दायित्व | २६९.६३ | २१७.६९ | २५७.६९ |

मा.आयोगाने, बहुवर्शीय नियमावली २०११ अनुसार म्हणजे वि.वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ या मुदतीतील पारेषण आकाराच्या प्रतीपूर्तीसह प्राप्ती कराची प्रति पूर्ती महापारेशनली तिमाही तत्वावर करावी अशी विनंती करण्यात येते.

## ३.२ दृष्यांचे विश्लेषण

महापारेषण कंपनी ज्या वातावरणात कार्य करते त्यातील दोन महत्वाच्या लेखा शीर्षातील खर्च या वातावरणात होऊ शकणाऱ्या बदलावर अवलंबून आहेत. ते म्हणजे पाच वर्षांच्याकाळात संचालन व सुव्यवस्था खर्चातील बदल आणि व्याजाच्या दरात होऊ शकाणारे बदल वरील ए आर आर चा वास्तवादी दृष्टीकोनातून विचार केला आहे. तरीही निराशावादी व आशावादी अशा दोन्ही दृष्टीकानातून प्रक्षेपणाचे करुन वरील दोन्ही खर्च कसे बदलू शकतील याचे दृष्टे/चित्रे दर्शविण्याचा प्रयत्न महापारेषणने केला आहे. ती खालीलप्रमाणे असतील.

### ३.२.१ संव सु खर्च

संचालन सुव्यवस्थेचे खर्च यामध्ये सामग्रीचा खर्च कर्मचाऱ्यांना शासकीय धोरणांनुसार द्यावयाचा पारिश्रमिक सर्वाधिक कराच्या शूल्काच्या रचनेतील बदल आणि अन्य कोणतेही शासकीय धोरणातील बदल यामुळे फरक पडु शकतो.

महापारेषणने खालील दोन दृष्ये तयार केली आहेत.

अ) निराशावादी दृष्ये : सं व सु खर्च वर्षभरात केलेल्या खर्चाच्या १० टक्क्याने वाढेल असे गृहित धरुन तयार केलेले दृष्य.

ब) आशावादी दृष्ये : ५ वर्षाच्या काळात सं व सु खर्च ५ टक्क्यांनी कमी होईल या अंदाजाने तयार केलेले दृष्य.

### ३.२.२. दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज :

पाच वर्षाच्या कालावधीत घेतल्या जाणाऱ्या नवीन कर्जावरील व्याजानुसार दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याजात फरक होऊ शकेल. यासाठी महापारेषणने खालील दोन दृष्ये तयार केली आहेत.

अ) **निराशावादी दृष्टीकोनानुसार दृष्य** : यामध्ये पाच वर्षाच्या काळात व्याज दरात वाढ होईल असा अंदाज केला आहे. महापारेषणने वि.वर्ष ११-१२ साठी १२.२५ टक्के व्याजदर आणि

वि.वर्षे १२-१३ ते १५-१६ या काळासाठी १३ टक्के असा व्याजदर विचारात घेतला आहे (पी एफ सी व आर इ सी यांच्याकडील कर्जावर)

ब) **<u>आशावादी दृष्टीकोनानुसार दृष्य</u>** : पाच वर्षाच्या काळात व्याजदराबाबत महापारेषणचे पुढीलप्रमाणे अंदाज केला आहे:

वि.वर्ष ११-१२ साठी १२.२५ टक्के आणिवि.वर्षे १२-१३ ते १५-१६ यासाठी ११.२५ टक्के असा व्याजदर (पी एफ सी व आर इ सी यांच्या कर्जावर)

### ३.२.३. <u>तीन दृष्यांनुसार ARR ची तुलना :</u>

प्रक्षेपित वार्षिक महसुलाच्या गरजेतील इतर घटक वास्तववादी दृष्यानुसार कायम राहतील, असे गृहित धरुन वास्तववादी दृष्यातील इतर खर्च खालीलप्रमाणे असतील.

**तक्ताक्र.१२: एआरआर मधील बाबी :वास्तववादी <u>(रु. कोटीत)</u>**

| तपशील | विवर्ष १२ | विवर्ष १३ | विवर्ष १४ | विवर्ष १५ | विवर्ष १६ |
|---|---|---|---|---|---|
| घसारा | ४६७.४७ | ५५३.३१ | ११०४.९७ | १३१८.६३ | १५४५.६९ |
| घसाऱ्यासाठी अग्रीम | २७७.६७ | ४२५.५१ | ३०.१९ | ०.०० | ३४.७८ |
| खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामत यावरील | ६८.६७ | १०१.०७ | १००.५२ | १११.७१ | १३४.१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| व्याज | | | | | |
| इतर व्याज व वित्तीय आकार | १५.९० | २२.५८ | २१.८४ | २२.०५ | १७.६० |
| इतर खर्च | ५९.४६ | १.१८ | १.२१ | १.२३ | १.२६ |
| प्राप्ती कर | १५४.९८ | ५३१.९२ | | | |
| आकस्मिक राखीव साठी योगदान | ३४.६५ | ३९.७३ | ४८.८५ | ५८.०१ | ६९.२९ |
| आर ओ ई | ५५६.५८ | ६३६.१२ | ८१७.६५ | ९४४.३७ | १०७८.४४ |
| (वजा) गोव्याचे व्हिलींग चार्जेस व दराव्यतिरिक्त उत्पन्न | २०.५२ | २०.५२ | २०.५२ | २०.५२ | २०.५२ |
| **इतर खर्च** | **१४३०.०९** | **२०९९.०२** | **१९०६.६५** | **२२२९.६५** | **२६४६.१६** |

वरील दृष्यांमध्ये सं व सु खर्च, दीर्घ मुदतीची कर्जे यांचे प्रक्षेपण करतांना ए आर आर च्या इतर खर्चातील बदल विचारात घेतलेले नाहीत. तीन दृष्यातील ए आर आर खालील प्रमाणे राहील.

### तक्ता क्र.१३ : दृष्यांचे विश्लेषण : ए आर आर बाबी

| आशावादी दृष्टीकोन | विवर्ष १२ | विवर्ष १३ | विवर्ष १४ | विवर्ष १५ | विवर्ष १६ |
|---|---|---|---|---|---|
| सं व सु खर्च | १०२४.१३ | १११९.२८ | १२७२.०७ | १४६१.९६ | १७३३.२४ |
| व्याज खर्च | ३०२.९० | ४२४.९३ | ६८४.९८ | ९८२.८९ | १२८०.७१ |
| **एकूण खर्च** | **२७५७.१२** | **३६६१.२३** | **३८६३.६९** | **४६७४.५०** | **५६६०.११** |

| निराशवादी दृष्टीकोन | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सं व सु खर्च | ११७९.२९ | १२८९.४६ | १४७२.९२ | १६९२.७९ | २००६.९१ |
| व्याज खर्च | ३९१.८१ | ५६४.९५ | ८५५.९१ | ११९९.११ | १५३०.१९ |
| **एकूण खर्च** | **३००१.२०** | **३९५३.४३** | **४२३५.४८** | **५१२१.५५** | **६१८३.२५** |
| वास्तववादी दृष्टीकोन | विवर्ष १२ | विवर्ष १३ | विवर्ष १४ | विवर्ष १५ | विवर्ष १६ |
| सं व सु खर्च | १०७५.८५ | ११७६.०१ | १३३९.०२ | १५३८.९० | १८२४.४६ |
| व्याज खर्च | ३५३.७१ | ५१२.६६ | ७८२.६५ | ११०६.४५ | १४२३.२७ |
| **एकूण खर्च** | **२८५९.६५** | **३७८७.६८** | **४०२८.३२** | **४८७५.००** | **५८९३.८९** |

वरील दृष्यांच्या निरिक्षणानंतर असे दिसून येईल की, वार्षिक महसूलाच्या गरजेचे अंदाज आशावादी दृष्यात सर्वात कमी आहेत तर निराशावादी दृष्टीकोनातील दृष्यात ते सर्वात जास्त आहेत.

## <u>३.३ कार्यपालनाचे निर्देशांक</u>

### <u>३.३.१. पारेषण प्रणालीची उपलब्धता :</u>

महापारेषण येथे नमूद करते की, गुणवत्तेच्या उद्दीष्टानुसार एच.व्ही.ए.सी. लाईनच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता ९८ टक्केपेक्षा जास्त आणि एच.व्ही.डी.सी. बाय पोल लिंकची उपलब्धता ९२ टक्केपेक्षा जास्त आणि एच.व्ही.डी.सी. बॅक टू बॅक स्टेशनची

उपलब्धता ९५ टक्के याप्रमाणे वि. वर्ष २०११-१२ ते वि.वर्ष २०१५-१६ या मुदतीत ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करण्यात येतील.

### ३.३.२. पारेषण हानी :

महापारेषण या विषयी नमूद करते की, पारेषणाच्या जाळीतील हानी विविध घटकांवर अवलंबून असते. ते म्हणजे भार केंद्रात बदल होणे, वीज पारेषण जाळयात ऊर्जेचा शिरकाव करणे तसेच तेथून ती काढून घेणे तसेच पारेषणाच्या साधनांच्या वापरात अंतर्गत होणारी तांत्रिक हानी तसेच सद्यपरिस्थितीत विजेचा भार पश्चिम दिशेला आहे तर विजेची निश्चिती प्रामुख्याने पूर्व दिशेला आहे. हीच परिस्थिती पुढेही चालू राहील.